## निशाणी क्र. १७९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाली आहे. प्रस्तूत प्रतिवादी ही मुंबई येथे राहत होती. तसेच तीचा वादींशी कायमचा संपर्क नव्हता. त्यामुळे ती मयत झाल्याबाबतची कोणतीही माहिती प्रस्तूत वादींना मिळालेली नव्हती. प्रतिवादी क्र. ७ चे वारसांच्या पत्त्याबाबत प्रस्तूत प्रतिवादींच्या मुलांशी संपर्क केला त्यावेळी प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ विठा रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाल्याचे समजले. सबब सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणे व सदर प्रतिवादीचे वारस दाव्यात सामील करणेत यावे.

प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा, (मयत वारस)

६अ. सुनिल रामचंद्र देवडा,
वय — ४८ वर्षे, व्यवसाय — नोकरी,

६ब. देवजी रामचंद्र देवडा,
वय — ३९ वर्षे, व्यवसाय — नोकरी,

६क. राजा रामचंद्र देवडा,
वय — ३९ वर्षे, व्यवसाय — नोकरी,

६ड. अनुपमा देवदार रणधीर,
वय — ५३ वर्षे, व्यवसाय — गृहिणी,

६ई. रमा पीटर ॲझम्पशन,
वय — ४२ वर्षे, व्यवसाय — गृहिणी,

६फ. सोनल संतोष पाठक,
वय — ४१ वर्षे, व्यवसाय — गृहिणी,

६ग. शितल देव्रेंद्र विचारे,
वय — ३६ वर्षे, व्यवसाय — गृहिणी,

सर्व रा. — अनुसयासुत को.ऑप.हाउ.सोसायटी लि.
इमारत क्र. १७४, खो.क्र. ५९/२४, बी विंग,
कन्नमवारनगर २, विक्रोळी पू. मुंबई.

वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. ६ हिस कायदेशीर वारस असून अन्य वारस नाहीत. सबब त्यांना या दाव्याचे कामी सामील करणेस व त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूतचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. नमूद वारस बाबत अपुरे असून सर्व वारस दाव्यात आणणे बंधनकारक आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. दाव्यातील प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ हि मयत झाली आहे, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. ६ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे :

— **आदेश** —

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि. क्र. १७७ वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाव्यामध्ये समाविष्ट करणेस परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक : ३०/११/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.12.03 10:28:22 +0530